International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा साहित्यविचार

**प्रा. डॉ. विजय रेवतकर**

महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

**सारांश (Abstract)**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील संतपरंपरेतील एक प्रभावी संतकवी, समाजसुधारक आहेत. त्यांच्या साहित्याचा मुख्य उद्देश समाजजागृती, नैतिक मूल्यांची स्थापना आणि राष्ट्रनिर्मिती हा होता. त्यांचे साहित्य केवळ आध्यात्मिक चिंतनापुरते मर्यादित राहिले नाही; तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन बनले. त्यांनी त्यांच्या अभंगाेतून समाजाला मानवविकासाची परिवर्तनशील अशी दृष्टी प्रदान केली आहे. त्यांनी विपुल लेखन केले. त्यात भजन, ओव्या, पोवाडे, श्लोक, आरत्या, त्यांची भाषणे अशा विविधप्रकारच्या साहित्याचा समावेश आहे. त्यांच्या साहित्यलेखनाची साहित्यविचारदृष्ट्या चिकित्सा केली असता त्यांची कलाविषयक आणि साहित्यविषयक असणारी भूमिका लक्षात येते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या लेखनातील साहित्यविचाराचा परामर्श घेता असे लक्षात येते की, साहित्य हे भक्तिसाहित्यापुरते मर्यादित असता कामा नये. साहित्याने सामाजिक, राष्ट्रीय आणि नैतिक पुनरुत्थानाच्या विचारांची दिशा प्रदान करावी, अशी त्यांची प्रमुख भूमिका आहे. ही त्यांची भूमिका साहित्याच्या निर्मिती आणि प्रयोजनामागेदेखील आहे. त्यांच्या साहित्यविचारात आध्यात्मिक साधना आणि व्यावहारिक जीवन यांचा सुंदर संगम दिसतो. साहित्यनिर्मितीतून समाजहीत साधले जावे. साहित्यातून मानवी मूल्ये प्रस्तुत होतील अशा आशयाचे लेखन व्हावे, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्पष्ट करतात. साहित्य हे समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे माध्यम व्हावे. कलाकाराने त्याच्या कलेद्वारे समाजजागृती व प्रबोधनाचे कार्य करावे, हे त्यांच्या साहित्यविचाराचे प्रमुख सूत्र राहिले आहे.

**बीजशब्द (Keywords)** संत, साहित्य, समाज, कला, प्रबोधन, विदर्भ

**प्रस्तावना (Introduction)**

महाराष्ट्राला संतांची थोर परंपरा लाभली. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामांपर्यंत अनेक जाती धर्मातील संतांनी सर्वसामान्य जनतेला आत्मोद्धाराचा आणि सामाजिक विकासाचा मार्ग दाखवला. राष्ट्रसंत तुकडोजी या संतांच्या थोर परंपरेतील; विदर्भाच्या कुशीत जन्मलेले अनमोल रत्न होय. त्यांचे

मूळ व्यक्तिमत्त्व आध्यात्मिक, ईश्वरपरायण तर होतेच, पण त्याला आधुनिकतेचे विशेष परिमाण लाभले होते. ते क्रांतिदर्शी संतकवी होते. वंदनीय महाराजांची सामाजिक दृष्टी आधुनिक आणि प्रगत आहे. महाराष्ट्राला महात्मा फुल्यांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सामाजिक सुधारकांची परंपरा लाभली. त्या सगळ्या चिंतकांच्या चिंतनाचे सार महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात एकवटले होते. म्हणूनच त्यांनी वर्णधर्म, स्पृश्यास्पृश्यता, ग्रामोन्नती, महिलोन्नती, अनिष्ठ रूढी, विवाहपद्धती, अंधश्रद्धा यासंबंधी समाजपरिवर्तनवादी दिशादर्शक विचार मांडले. त्यांचे विचार आधुनिक होते आणि त्यानुसार त्यांनी केलेली कृती प्रगमनशील आणि सामर्थ्यसंपन्न होती. वंदनीय महाराजांनी ईश्वराला जनताजनार्दनामध्ये बघितले आणि जनतेची सेवा हीच ईश्वराची सेवा समजून त्यांनी समाजाच्या उद्धाराकरिता अविश्रांत श्रम घेतले.

महाराष्ट्राच्या मध्ययुगात चक्रधर, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास यांसारख्या संतांची वैभवशाली परंपरा लाभली. या संतांची उज्ज्वल परंपरा पुढे नणारे अक्कलकोटचे स्वामी समर्थ, टेंबे स्वामी, गोंदवलेकर महाराज, दासगणू महाराज, स्वामी स्वरूपानंद आदी संत आधुनिक काळात होऊन गेले. विदर्भाच्या भूमीला सिद्ध संतांची परंपरा लाभली आहे. संत गाडगेबाबा, गुलाबराव महाराज, अडकोजी महाराज यांसारखे संत येथे उदयाला आले. श्री. गजानन महाराजांसारख्या सिद्ध पुरुषांनी अनेक पीडितांची दुःखे दूर केली. त्यांना जगण्याचा दिलासा दिला. विनोबा भावे यांनी आपल्या विचारांनी महाराष्ट्राचे जीवन सुसंस्कारित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजही विदर्भाच्या भूमीतलेच. तुकडोजी महाराजांनी आपल्या भजनांतून समाजजागृती केली. राष्ट्रसंत व्यामिश्र व्यक्तिमत्त्वाचेचे धनी आहेत. त्यांचे जीवन आणि कार्य विश्वसनीय आहे. प्रस्तुत लेखात आपण राष्ट्रसंतांचा साहित्यविचार समजून घेऊया.

राष्ट्रसंतांनी विसाव्या शतकाच्या मध्यावधीत आपल्या गद्य आणि पद्य वाङ्मयाच्या लेखनाला सुरुवात केली. त्यांचे साहित्य श्रीगुरुदेव प्रकाशन संस्थेने साहित्यरसिकांपुढे आणले. त्यांचे लेखन विविधांगी आणि विपुल स्वरूपाचे आहे. त्यांनी त्यांच्या लेखनाने भारतीय भाविकांना आणि रसिकांना दीपवून टाकले. त्यांच्या मराठी-हिंदी भजनाने, श्लोकाने, अभंगांने आणि ओवीने इतका प्रभाव निर्माण केला की ग्रामीण समाजजीवनास नवी उर्मी प्राप्त झाली. खेड्यांतील झोपड्यांत त्यांच्या अभंग, ओवी आणि श्लोकांचे गुंजन आजही होत आहे.

राष्ट्रसंतांनी काव्यलेखनप्रवाह समृद्ध केला आहे. संतपरंपरेत त्यांचे काव्यलेखन उच्च श्रेणीतील मानावे लागते. 'त्यांनी 1160 भजने, 2109 अभंग, 5149 ओव्या, 676 श्लोक, 10 पोवाडे, 13 आरत्या, 16 मंगलाष्टके, 32 श्रीगुरुमहिमामृत ओळी, हिंदी राष्ट्रभाषेत 2369 भजने, 1746 बरखा, 8 प्रार्थनाश्लोक याशिवाय 4 स्वागतगीते, 818 सुविचारलेखन, श्रीगुरुदेव महिमामृत 32 ओळी तसेच 615 मराठी-हिंदी

भाषणे व लेख लिहिले.'[1] अशी विपुल साहित्यरचना त्यांनी केली व ही त्यांची रचना श्रीगुरुदेव सेवा मंडळाने प्रकाशित केली.

राष्ट्रसंतांची साहित्याबद्दलची धारणा अगदी स्पष्ट होती. ते म्हणतात, "मी साहित्य पुस्तकातून शिकलो नाही. अफाट जनसागरातून, हृदयाच्या गाभाऱ्यातून, आंतरिक उचंबळीतून मी साहित्य शिकलो. साहित्याची कल्पना मला जनसागरात मिळाली. साहित्य झब्बूशाहीसाठी, दीनदुबळ्यांच्या झोपड्या चिरडण्यासाठी नाही. जगाला जागवण्यासाठी, जगाच्या निरीक्षणासाठी, जगाच्या विशालतेते विलीन होण्याचे शिक्षण घेण्यासाठी आहे. तकलादू क्षणजीवी साहित्याचे भवितव्य विनाशाकडे वळणारे असते."[2] त्यांना समाजात वावरताना जे प्रत्यक्ष अनुभव आले ते त्यांनी लिहिले आहेत. त्यांनी माणसे वाचली, माणसांचे भलेबुरे संस्कार, प्रेरणा, त्यांचे सुख-दुःख, आशा-निराशा, क्षमता-अगतिकता, स्वातंत्र्य-बंधने, प्रेम-द्वेष, स्वप्न-वास्तव, अहंकार-लीनता, भय-मोह अशा परस्पर संवादविरोधी व्यक्तित्वातील भावनांचे त्यांनी चिंतन केले व त्यातून आलेल्या अनुभवाविष्कारातून, व्यापक जीवनदृष्टीतून साहित्याचे लेखन केले.

तुकडोजी महाराज साहित्याकडून अपेक्षा नोंदविताना स्पष्ट करतात की, "साहित्याची महान शक्ती जगातील मोठ्या शक्तीपैकी एक आहे...या शक्तीचा उपयोग माझ्या समाजाला व्हावा, आमच्या देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ही शक्ती भक्तिभावाने वेचली जावी...साहित्य हे समाजाला सामर्थ्य देऊन पुढे नेण्याचे माध्यम आहे"[3] साहित्य हे समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे अशी धारणा राष्ट्रसंतांची होती. लोकजीवनाला सुखी सुंदर करण्यासाठी साहित्यिकांचा हातभार लागावा अशी अपेक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्यिकांकडून करताना दिसून येतात. त्यांनी साहित्य हे समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे माध्यम असल्याचे म्हटले आहे. ते म्हणतात, "समाजातल्या वैषम्याच्या भिंती पाडणारे साहित्य व असे साहित्य निर्माण करणारे साहित्यिक मला अपेक्षित आहेत"[4] अर्थातच समाजातल्या भेदकारणांचे निराकरण करणारे साहित्य हेच महाराजांच्या मते समाजाच्या सामर्थ्याचे निधान असून सामर्थ्यशाली समाजच सर्वोपरी विकासमान समाज ठरतो म्हणून साहित्यिकाने भक्तिभावाने भेदनिवारक साहित्य निर्माण केले पाहिजे, असे ते सांगतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

"मै कवि नही करुणा हूँ, मै उन दुखियों की दीन की।
मै साधू नहीं साधाना हूँ, प्रेम ही सत् नेम की।।
ना शान्ति है मुझमे, हूँ मै पिछडे जनों की भावना।।
इन्सान बनने जो चले, मै उनकी हूँ शुभकामना।।"

महाराजांच्या या ओळींतून त्यांची साहित्यधारणा प्रकट होते. एकूणच सामाजाचे प्रबोधन करणारी साहित्यदृष्टी राष्ट्रसंतांची होती. प्रबोधन आणि परिवर्तन ही निर्मितिप्रेरणा त्यांच्या साहित्यलेखनाच्या

केंद्रस्थानी राहिली आहे. त्यांनी शुद्ध कलावादी साहित्यदृष्टीला नाकारले. महाराजांच्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणेविषयी अक्षयकुमार काळे म्हणतात, 'महाराजांच्या मनातील सर्जनशील अशांती हा विश्वकरुणेचाच गोचर असा भाग होता. त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या खोल बुडाशी त्यांना वेढून असणारी ही अशांतीच होती. आपल्या कवित्वापेक्षा आणि साधुत्वापेक्षा करुणेची आणि साधनेची महती त्यांना अधिक होती.''[5] राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लोकविलक्षण असे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या लोककल्याणकारी व्यक्तिमत्त्वाच्या अंतरंगातून त्यांचे साहित्य निर्माण झाले आहे. विश्वचिंता आणि विश्वकरुणा हा त्यांच्या व्यक्तित्वाचा अविभाज्य भाग राहिला आहे. सभोवतालचा समाज आणि विशेषतः ग्रामीण प्रदेशातून त्यांचे व्यक्तित्व आकारास आल्याने ती ग्रामभूमी आणि तिची दयनीय अवस्था त्यांच्या निदिध्यासाचा विषय झाली; आणि 'ग्रामगीता'सारखी रचना आकारास येऊन ग्रामोद्धाराचा मंत्र त्यांच्या या रचनेने सहजउत्स्फूर्तपणे दिला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्यिकांवर सर्व धर्म, नीती, संस्कृतिसंवर्धनाची जबाबदारी टाकतात असे नाही. निखळ मनोरंजनाला त्यांचा विरोध नाही; मात्र साहित्य हे 'सहित' असावे. त्यांत अहितकारक असता कामा नये, अशी त्यांची भूमिका होती. ते म्हणतात, ''मनोरंजनापासून जगाला अलग करता येत नाही याची मला जाणीव आहे. परंतु ते मनोरंजन समाजाला विकृत बनवणारे विद्रूप साधन ठरू नये. हिरे, मोती, फुले, तारका यांतील सौंदर्यासोबतच दुःखितांचे अश्रू, श्रमिकांचे धर्मबिंदू यांत असलेल्या सौंदर्याची चमक साहित्यिकांनी बघितली पाहिजे. समाजामध्ये सत्य, पवित्रता, सुंदरता यावी, याकडे साहित्यकलेचे पर्यायाने साहित्यिकांचे लक्ष असावे''[6] एकूणच साहित्यिकांनी त्यांची साहित्यनिर्मिती समाजहित लक्षात घेऊन मानवी मूल्ये प्रस्तुत होतील अशा आशयातून करावी, अशी अपेक्षा तुकडोजी महाराज व्यक्त करतात. लोकजीवनापासून फटकूण वागणाऱ्या साहित्यिकांबद्दल तुकडोजी महाराज म्हणतात, ''साहित्योपासकांच्या लेखनकलेचे नांगर इतक्या वेगाने पुढे सरकत आहे की मागचा सर्वभाग अविचार आळसादिकांच्या तणकटाने व्यापलेला तसाच राहून गेला आहे व त्यात कर्तव्याचे पीक होणेच दुरापास्त झाले आहे. त्यामुळे विद्वानांचा वर्ग कौशल्यपूर्ण लेख लिहीत व भाषणे देत एकीकडे वाङ्मयक्षेत्राच्या टोकावर खेळ खेळत बसला आहे आणि अशिक्षित समाजास विविध मतांची विचित्र गुंतांगुंत उकलून पुढे पाऊल टाकणेच कठीण झाले आहे. अशा स्थितीत समाजाच्या या विस्कटलेल्या घडीचे संबंध फिरून जोडण्याकरिता एकतर साहित्यिकाने मागे येऊन व्यवहाराला आपल्या परीने तरी न्यावे किंवा प्रगत करावे...''[7] एकूणच साहित्यिकांनी जीवननिष्ठा जोपासावी, जीवनाला आकार द्यावा, विचारप्रवृत्त करणारे साहित्य निर्माण करावे, असे तुकडोजी महाराजांना अपेक्षित होते.

राष्ट्रसंतांनी अभंग, भजने जनजागृती आणि प्रबोधनासाठी लिहिले आहेत. लोकमानसाला थेट भिडण्यासाठी खंजिरी भजन हे प्रभावी माध्यम त्यांनी मानले. खंजिरी भजन हा त्यांच्या व्यक्तित्वाचा

अविभाज्य विशेष होता. त्यांच्या प्रांजळ, परखड व्यक्तिमत्त्वाशी ते अधिक निगडित होते.

‘कधी येशिल मनमोहना, पाहण्या भारत अपुला पुन्हा।
भारता ग्रहण लागले आणि गुलाम जन जाहले।
तोडण्या येई बंधना, पाहण्या भारत अपुला पुन्हा।’

त्यांच्या भजनातील हे शब्द मराठी राष्ट्रीय कवितेत नवा जोम भरतात. ते म्हणतात,

‘हिंद प्रभूच्या लेकरांनो, स्वस्थ का बसले असे?
भारताचे ग्रहण हे, नेत्री तुम्हा बघवे कसे?’

अशा शब्दांनी तरुणांची मने ते चेतवितात. साहित्याने जनमानसाला चेतवावे, अंतर्मुख करावे, अशी विचारसरणी स्वीकारून त्यांनी आपल्या अभंग, श्लोक, ओव्यांची निर्मिती केली आहे.

मी काव्यरचना का करतो याविषयी वंदनीय महाराज म्हणतात,

‘चित्त लावावे ध्यानी। मन गुंतवावे लेखणी।।
देह पडावा भजनी। सेवा करावी जीवांनी।।
म्हणुनी उपक्रम केला। तुज गाईले विठ्ठला।।
तुकड्या म्हणे नाही आस। उपदेशावयास कोणास।।’

संतग्रंथांचे अध्ययन आणि विश्वाचे निरीक्षण यातून राष्ट्रसंतांचे साहित्य आकारास आले. त्यांनी आपल्या काव्यरचनेचा उद्देश प्रबोधन हेच मानले आहे.

राष्ट्रसंतांचे साहित्यलेखन साहित्यगुणांनी नटले आहे. त्यांच्या लेखनास वाङ्मयीन सौंदर्यदेखील प्राप्त झाले आहे. त्यांच्या रचना केवळ प्रचारकी ठरत नाहीत कारण त्यांच्या काव्यरचनेत वृत्तबद्ध रचना लक्षात येतात. त्यांनी भुजंगप्रयात, शार्दुलविक्रीडीत अशा वृत्तांतून लेखन केले. ओवीवृत्तदेखील त्यांच्या लेखनाचे विशेष आहे. ‘आनंदामृत’, ‘आत्मप्रभाव’, ‘ग्रामगीता’ आदी ग्रंथ ओवीवृत्तात लिहिले आहेत. ‘ग्रामगीता’ या ग्रंथातील 4675 ओव्या साधारणतः चार तसेच साडेतीन चरणाच्या आहेत. त्यांच्या काव्यलेखनात अलंकारीकताही स्पष्टपणे जाणवते. त्यात शब्दालंकार व अर्थालंकार अशा दोन्ही अलंकारप्रकाराचा त्यांनी वापर केला आहे. विशेषतः त्यांच्या काव्यरचनेत अनुप्रास, उपमा, स्वभावोक्ती, श्लेष, दृष्टांत अलंकार प्रत्ययास येतात. राष्ट्रसंतांनी त्यांच्या काव्यलेखनात वऱ्हाडी बोलीतील शब्द मोठ्या प्रमाणात वापर केले आहे. त्यांचे काव्यलेखन उत्कट रसात्मकतेचा प्रत्यय देऊन जाते. वीर, भक्ती, करुण, भयानक, रौद्र अशा रसांचा सहज प्रत्यय येतो. वंदनीय महाराज त्यांची साहित्यनिर्मिती करीत असताना वाङ्मयीन रचनातंत्राचा बाज ढळू देत नाहीत, हे विशेष. त्यामुळेच त्यांचे साहित्य रसिकप्रिय झाले असून त्यांचे साहित्य केवळ प्रचारकी न ठरता कलात्मक सौंदर्याचादेखील प्रत्यय त्यांच्या साहित्यलेखनातून येतो. अर्थात त्यांना वाङ्मयीन गुणविशेषांचीदेखील जाण होती, असे म्हणावे लागते.

त्यांची साहित्यासोबतच इतर ललित कलांविषयक दृष्टीदेखील विलक्षण सामाजिकतेचा प्रत्यय देणारी आहे. ते म्हणतात,

“कलेकरिता कला न ठेवी। जीवनासि कला भूषवी।
आपण सजवूनि, दुसऱ्या दाखवी। मनुष्यपण गोड शब्दे।। ”[8]

कला ही केवळ मनोरंजन करणारी नसावी तर तिने जीवनाला प्रबोधित करावे, अशी कलेविषयीची दृष्टी महाराजांची होती. त्यांनी लिहिलेल्या एका पत्रातून त्यांची कलादृष्टी प्रतीत होते ते म्हणतात, “कलावान मंडळी जर आपल्या कलेतून राष्ट्र जागृतीचे काम करू लागली तर माझ्या भारतदेशाला सर्व तऱ्हेने उन्नत होण्याला मुळीच वेळ लागणार नाही...कलावंतासमोर राष्ट्रजागृतीचा दृष्टिकोण आला की कलेने मनोरंजन आणि राष्ट्राचा विकास या दोन्ही गोष्टी घडतील आणि भारतदेश शानदार होईल...साधूच समाजशिक्षणाचे काम करतो असे नाही. ही कामे कार्यकर्त्यांनी, कलावंतांनी सर्वांनी वाटून घ्यावयाची असतात”[9] कलाकाराने त्याच्या कलेद्वारे समाजजागृती व प्रबोधनाचे कार्य करावे, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रसंतांनी स्वीकारली. त्यांनी मनोरंजनाबरोबरच राष्ट्रोद्धार हे कलेचे कार्य मानले, हीच त्यांची कलादृष्टी होती.

**निष्कर्ष (Conclusions)**

1. साहित्य हे समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे, अशी धारणा राष्ट्रसंतांची होती.
2. प्रबोधन आणि परिवर्तन ही निर्मितिप्रेरणा त्यांच्या साहित्यलेखनाच्या केंद्रस्थानी राहिली आहे.
3. कला ही केवळ मनोरंजन करणारी नसावी तर तिने जीवनाला प्रबोधित करावे.
4. साहित्यिकांनी त्यांची साहित्यनिर्मिती समाजहित लक्षात घेऊन मानवी मूल्ये प्रस्तुत होतील अशा आशयातून करावी, अशी अपेक्षा तुकडोजी महाराज व्यक्त करतात.

**संदर्भसूची (References)**

1. रघुनाथ कडवे, ‘मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज: जीवन आणि कार्य’, अमोल प्रकाशन नागपूर, द्. आ. 2012, पृ. 342.
2. संपा. अक्षयकुमार काळे, ‘राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय’, विसा बुक्स, 2008 नागपूर, प्रस्तावना, पृ. 12
3. सुभाष सावरकर, ‘राष्ट्रसंताची साहित्यदृष्टी आणि जनसाहित्य’, संपा. अक्षयकुमार काळे, उ. नि., पृ. 113
4. तत्रैव, पृ. 113
5. संपा. अक्षयकुमार काळे, ‘राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय’, उ. नि., प्रस्तावना, पृ.

12
6. तत्रैव पृ. 141
7. तत्रैव पृ. 141
8. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, 'ग्रामगीता', महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, मुंबई, पृ. 385
9. संपा. बाबा मोहोड, 'राष्ट्रसंतांची पत्रे', श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, स.आ., 2006, पृ. 96